# महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला आणि बिजोत्पादक शेतकरी यांचेतील बिजोत्पादनाचा करारनामा

(रु. २००/- जनरल स्टॅम्प पेपरवर) (Non Judicial Stamp Paper)

पक्ष क्रमांक १ : महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला
मुख्य कार्यालय, महाबीज भवन, कृषी नगर, अकोला
तर्फे जिल्हा व्यवस्थापक, म.रा.बि.म. मर्यादित, ..........
(पक्ष क्र. १ यास यापुढे महाबीज असे संबोधण्यात येईल)

आणि

पक्ष क्रमांक २ : श्री. ......................................................................
व इतर एकुण.................... बिजोत्पादक, सर्व रा. ..............................
ता. ............................ जि. ................ धंदा - शेती
(यापुढे पक्ष क्र. २ या सर्वांना बिजोत्पादक असे संबोधण्यात येईल)
(यात त्यांचे कायदेशीर वारस व प्रतिनीधी समाविष्ट असतील)

महाबीज हे शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे शेतकऱ्यांचे प्रक्षेत्रावर बियाणे माणकानुसार उत्पादित करुन पुरवठा करते. त्यासाठी महाबीज हे बीज उत्पादनाचा कार्यक्रम शेतकऱ्यांकडून घेते. सन .................. च्या .............. हंगामात आयोजित करावयाच्या बीज उत्पादन कार्यक्रमाकरीता महाबीजकडून प्राप्त माहीतीनुसार बिजोत्पादकाने त्यांचे मर्जीने कार्यक्रम घेण्याची इच्छा दर्शविली व त्यासाठी आवेदन केले. आवेदनानुसार महाबीज ने त्यांना परिशिष्ट क्र. १ मध्ये बिजोत्पादकनिहाय पीक / वाण / दर्जानिहाय बिजोत्पादन कार्यक्रम, या कार्यक्रमाचे आवश्यक ते किमान क्षेत्र व बियाणे माणकांचे तसेच परिशिष्ट क्र. २ मध्ये नमूद महाबीज व्यवस्थापनाने ठरविलेल्या पात्र बियाणे खरेदी धोरणाचे अधीन राहून आवंटीत केलेला आहे.

या बिजोत्पादन कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता उभय पक्षांनी ठरविलेल्या व मान्य केलेल्या अटी प्रमाणे उभय पक्षांमध्ये आज दि. .................... रोजी करारनामा करण्यात येतो की :-

१) उपलब्ध बिजोत्पादन कार्यक्रमाच्या अनुषंगाने कोणता कार्यक्रम कशा प्रकारे आवंटीत करावयाचा हा हक्क महाबीजला राहील व त्यास बिजोत्पादकांची संमती राहील. अशा प्रकारे आवंटीत झालेल्या कार्यक्रमाच्या बाबतीत बिजोत्पादक या नात्याने संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक ती संपूर्ण माहिती बिजोत्पादनाच्या वेगवेगळ्या टप्प्यांना धरुन वेळोवेळी हे बिजोत्पादक उपलब्ध करुन देतील व संबंधित अधिकाऱ्यांच्या आवश्यक सुचनांचे पालन विना अट करतील.

बिजोत्पादन कार्यक्रमाचे प्रमाणिकरणाकरीता बीज प्रमाणिकरण यंत्रणेच्या नियमानुसार आवश्यक असणारी क्षेत्र तपासणी फी, नोंदणी फी, सेवा शुल्क इत्यादी बीज प्रमाणिकरण यंत्रणेच्या वतीने बिजोत्पादन कार्यक्रम आवंटीत करते वेळीच संकलीत करण्याचा व कार्यक्रम नोंदणीचे वेळी एकत्रितपणे बीज प्रमाणिकरण यंत्रणेकडे भरणा करण्याचा अधिकार महाबीजला राहील. अशा प्रकारे कार्यक्रम नोंदणी नंतर काही नैसर्गिक कारणास्तव बिजोत्पादन क्षेत्र वखरल्यामुळे नोंदणी केलेले क्षेत्र प्रमाणिकरणामधून काढणे भाग पडल्यास त्या बाबतचा बीज प्रमाणिकरण यंत्रणेचा निर्णय अंतीम राहील. अर्थात या संदर्भात बीज प्रमाणिकरण यंत्रणेकडे भरणा केलेली फी/शुल्क यंत्रणेने

(पान २ .... वर)

महाबीजला एकल व एकमुठीने परत न करण्याचा निर्णय झाल्यास, अशा प्रकारचे बिजोत्पादकांच्या वतीने भरणा केलेली फी/ शुल्क आदी रक्कम महाबीजकडून परतावा करण्याचा बिजोत्पादकांचा आग्रह वा अधिकार राहणार नाही. ही बाब सत्यप्रतीदर्शक बिजोत्पाद कार्यक्रमाकरीता सुध्दा लागू राहील.

२) बीज प्रमाणिकरण यंत्रणेच्या सर्टीफिकेट/तपासणी अहवालाशिवाय बिजोत्पादन कार्यक्रम प्रमाणित होणार नाही. याची बिजोत्पादकांना पूर्ण जाणीव आहे व त्यादृष्टीने बिजोत्पादन क्षेत्राची तपासणी बीज प्रमाणिकरण यंत्रणेकडून वेळीच करुन घेण्याची सर्वस्वी जबाबदारी ही बिजोत्पादकांची राहील, तसे न केल्यास होणाऱ्या नुकसानीसाठी बिजोत्पादक पूर्णपणे जबाबदार राहतील. सत्यप्रतीदर्शक बिजोत्पादन कार्यक्रमाची तपासणी महाबीज अधिकाऱ्यांकडून करण्यात येईल.

३) बिजोत्पादनास आवश्यक ठरणारे मुलभूत, पायाभूत इतर स्त्रोत बियाणे हे महाबीज बिजोत्पादक, कृषिविद्यापीठ, विविध प्राधीकृत बिजोत्पादक संस्था यांच्याकडून प्राप्त करुन ते उपलब्धतेप्रमाणे बिजोत्पादकांना पुरविण्याची जबाबदारी महाबीजची राहील. याबाबत शुध्दता/ गुणवत्ता या बाबतचे सर्टीफिकेट/कागदपत्र यांना आधार ठरवून असे बियाणे महाबीज संबंधित बिजोत्पादकांस रोखीने पुरविल व अशा प्रकारे महाबीजद्वारा प्राप्त झालेले स्त्रोत बियाणे महाबीज कार्यालयापासून नेण्याची व्यवस्था बिजोत्पादक करतील. हे बियाणे दुसऱ्या बिजोत्पादकांना अथवा अन्य कंपनीला/व्यक्तीला बियाणे उत्पादनासाठी हस्तांतरीत करता येणार नाही, जर महाबीजला अशी बाब निदर्शनास आली तर उत्पादीत केलेले बियाणे विकत घेण्याची जबाबदारी महाबीजवर राहणार नाही, शिवाय करारभंग केल्याबद्दल प्राप्त परिस्थितीच्या आधारावर संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची महाबीजला मुभा राहील. तसेच सदरहू बियाण्यांची किंमत नुकसान भरपाईसह वसूल करण्याचा महाबीजला अधिकार राहील.

४) बिजोत्पादकांना बिजोत्पादन कार्यक्रम आवंटन केल्यानंतर आवश्यक असणारे मुलभूत/ पायाभूत/ प्रमाणित- १/ सत्यप्रतीदर्शक स्त्रोत बियाणे विद्यापीठ किंवा तत्सम संबंधित मान्यता प्राप्त संस्थाकडून उपलब्ध झाल्यानंतरच पुरविण्यात येईल. अन्य काही कारणास्तव अशा बिजोत्पदनासाठी आवश्यक असणारे बियाणे उपलब्ध न झाल्यास बिजोत्पादकांना बियाणे पुरवठा न करता येऊ शकल्यामुळे बिजोत्पादकांचे क्षेत्र रिकामे राहिल्यास त्याबद्दल महाबीज जबाबदार राहणार नाही. तसेच या बाबत कुठलाही नुकसान भरपाईचा दावा/ तक्रार महाबीज विरुध्द करता येणार नाही.

५) बिजोत्पादन कार्यक्रम देतांना बिजोत्पादकांनी लेखी स्वरुपात दिलेल्या माहितीनुसार बिजोत्पादन कार्यक्रमाची बीज प्रमाणिकरण यंत्रणेकडे नोंदणी करण्यात येईल आणि एकदा नोंदणी झालेले क्षेत्र परस्पर हस्तांतरीत करता येणार नाही. तसेच नोंदणीसाठी दिलेल्या गावाच्या नावात/ क्षेत्रात बदल करता येणार नाही. बिजोत्पादकांवर त्यांचे बिजोत्पादन क्षेत्राची तपासणी बीज प्रमाणिकरण यंत्रणेकडून करुन घेणे अनिवार्य राहील. अशा क्षेत्र तपासणीच्या वेळी स्त्रोत बियाण्याच्या थैल्यांचे टॅग/लेबल तथा आवश्यक ती कागदपत्रे प्रमाणिकरण यंत्रणेस दाखविण्याची जबाबदारी संबंधीत बिजोत्पादकांची राहील व त्या अभावी किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणाने क्षेत्र तपासणी न झाल्यास, त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत बिजोत्पादकांची राहील.

६) बीज प्रमाणिकरणाचे वा महाबीजच्या, प्रमाणित अथवा सत्यदर्शक किंवा इतर प्रकारच्या बियाणे उत्पादना संबंधीचे प्रचलीत माणकांप्रमाणे व वेळोवेळी अमलात येणारे सर्व नियम पाळणे बिजोत्पादकांवर बंधनकारक आहेत. तसेच बीज प्रमाणिकरण यंत्रणेकडून आकारण्यात येणारे त्या वर्षातील वाढीव शुल्क तसेच वाढीव क्षेत्राकरीता आकारण्यात येणारे तपासणी शुल्क व इतर शुल्क इत्यादी सदर यंत्रणेच्या वतीने संबंधीत बिजोत्पादकांकडून वसुल करण्याचा अधिकार महाबीजला राहील. ही बाब सत्यप्रतीदर्शक कार्यक्रमाकरीता सुध्दा लागू राहील.

७) पायाभूत तथा प्रमाणित बियाण्याच्या बाबतीत बीज प्रमाणिकरण यंत्रणेने निर्धारित केलेले व मोहोरबंद केलेले तसेच सत्यप्रत बियाणेचे बाबतीत महाबीज मधील सक्षम अधिकाऱ्याने निर्धारित केलेल्या मात्रेपेक्षा जास्त किंवा कमी मात्रेचे कच्चे बियाणे स्विकारावे किंवा नाही याबाबतचा संपूर्ण अधिकार हा महाबीजला राहील. तसेच संबंधित बिजोत्पादकांनी उत्पादित केलेले सर्व बियाणे महाबीजने ठरवून दिलेल्या मुदतीत महाबीजचे बीज प्रक्रिया केंद्रावर स्वखर्चाने बीज प्रमाणिकरण यंत्रणेच्या मळणी प्रमाणपत्रासह आणून द्यावे लागेल व त्यास विलंब झाल्यास ते बियाणे स्विकारणे महाबीजवर बंधनकारक राहणार नाही. अथवा परिस्थितीनुसार अशा बियाण्याच्या बाबतीत महाबीजला बिलंब शुल्क म्हणून कमी हमी किंमत देण्याचा अधिकार राहील.

विशेष परिस्थितीमध्ये जर महाबीजने बिजोत्पादकांनी उत्पादित केलेल्या बियाण्याची निर्धारित बीज प्रक्रिया केंद्रापर्यंत वाहतूक केल्यास अशा वाहतूकीचा तसेच जकात वा अन्य करांसाठी महाबीजने केलेला खर्च बिजोत्पादकांना करण्यात येणाऱ्या पहिल्या शोधनातुन कपात करण्याचा अधिकार महाबीजला राहील.

(पान ३ …. वर)

८) बिजोत्पादकांनी दिलेल्या कच्च्या बियाण्याला अग्रीम शोधन दर निश्चित करण्याचा अधिकार महाबीजचा राहील. तसेच बियाण्याचा दर्जा जसे की, पावसाने ओले झालेले/हलक्या प्रतिचे/रंगहीन/डागाळलेले इत्यादी कारणांनी तपासणी करुन त्यास अग्रीम शोधन देणे किंवा न देणे किंवा जाहीर केलेल्या दरापेक्षा कमी दराने अग्रीम शोधन करण्याचा अधिकार महाबीजला राहील व त्या दृष्टीने महाबीजचे संबंधित अधिकारी हे सक्षम अधिकारी म्हणून निर्णायक अधिकारी राहतील.

९) पायाभूत/प्रमाणित व सत्यदर्शक बिजोत्पादन कार्यक्रमातील उत्पादीत कच्चे बियाणे स्विकारण्यापुर्वी / प्रक्रीयेपुर्वी महाबीजद्वारे घेतलेल्या चाचणीत पात्र ठरलेल्या कच्च्या बियाण्यावरील प्रथम प्रक्रिया खर्च महाबीज करील. तथापी काही कारणांमुळे पुर्नचाळणी/चाचणी करावी लागल्यास अशा पुर्नचाळणी/चाचणीचा खर्च बिजोत्पादकांना करावा लागेल. उत्पादीत कच्चे बियाणे स्विकृतीपुर्व/प्रक्रीयापुर्व चाचणीत अपात्र ठरल्यास, असे बियाणे महाबीजकडून स्विकारण्यात येणार नाही. तसेच बिजोत्पादक, बियाण्याची मळणी, साठवणूक व वाहतुक यावरील खर्च स्वतः करतील. मर्यादेपेक्षा जास्त निम्नस्तर बियाणे आढळल्यास, अशा लॉटचे बिजोत्पादकांकडून अतिरिक्त झालेला प्रक्रिया खर्च त्या प्रमाणात वसुलीचा अधिकार महाबीजला राहील. जे बियाणे प्रमाणिकरणाच्या चाचणीत किमान बियाणे माणकानुसार पात्र ठरेल असेच बियाणे महाबीजद्वारे जाहीर केलेल्या हमी भावाने खरेदी करण्यात येईल आणि बिजोत्पादन अनुदान योजने अंतर्गत अनुदान/बोनस असल्यास सदरची अनुदान रक्कम शासनाकडून प्राप्त झाल्यानंतरच त्याप्रमाणे त्याप्रमाणात अदा करण्यात येईल.

महाबीजने ठरविलेल्या मुदतीच्या आत बीज प्रक्रीया केंद्रावर संबंधित बिजोत्पादकांनी त्यांचे कच्चे बियाणे स्वतःचे खर्चाने आणून न दिल्यास, तसेच बिजोत्पादन कार्यक्रमातील अपेक्षीत उत्पादना एवढे कच्चे बियाणे महाबीजला देण्यास असमर्थ ठरल्यास किंवा न दिल्यास, महाबीज सर्व बाबी विचारात घेवून अशा बिजोत्पादन क्षेत्रातील अपेक्षित प्रमाणित बियाण्याच्या रक्कमेची मागणी करेल अथवा त्या किमती एवढ्या रक्कमेचा दावा संबंधित बिजोत्पादकांविरुध्द दाखल करुन अशी रक्कम वसुल करेल.

१०) महाबीज पायाभूत/प्रमाणित/सत्यदर्शक दर्जाचे असे सर्व कसोट्यांमध्ये पारीत झालेले पात्र बियाणेच खरेदीधोरणानुसार विकत घेईल व अपात्र/नापास झालेले बियाणे महाबीजने दिलेल्या मुदतीत बीज प्रक्रिया केंद्रावरुन संबंधित बिजोत्पादक परत घेऊन जाईल. असा साठा विहीत मुदतीचे आत परत न नेल्यास, त्यावर साठवणूक खर्च आकारण्याचा अधिकार महाबीजला राहील. अपात्र/नापास झालेले बियाणे उचल करण्यापूर्वी बिजोत्पादकांना त्यांच्याकडे येणे असलेली रक्कम व प्रक्रिया शुल्काचा अगोदर भरणा करावा लागेल. तसे न केल्यास बियाणे विल्हेवाटी संबंधी महाबीजने घेतलेले निर्णय बिजोत्पादकांना बंधनकारक राहतील. बीज प्रमाणिकरण यंत्रणेकडून घेतलेल्या चाचणीत बियाणे नापास झाल्यामुळे बिजोत्पादकाचे काही नुकसान झाल्यास अशा नुकसानीस महाबीज कुठल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

११) ज्यावेळी बिजोत्पादनाचा व्यवहार हा कृषि उत्पन्न बाजार समितीच्या कार्यकक्षेत येईल, त्यावेळी असा कृषि उत्पन्न बाजार समितीचा प्रचलीत कर/शुल्क बिजोत्पादकांना भरावा लागेल व अशी रक्कम संबंधित बिजोत्पादकांचे अंतीम शोधनातून वळती करण्यात येईल व यास बिजोत्पादकांची सहमती राहील.

१२) बिजोत्पादनासाठी महाबीजच्या हमीनुसार राष्ट्रीयकृत/सहकारी अथवा इतर बँकेने बिजोत्पादकांना पत पुरवठा केला असल्यास महाबीजद्वारे त्याची वसूली परस्पर बियाण्याचा अग्रीम तथा अंतीम शोधनातून संबंधीतांकडे वर्ग करण्यात येईल, यास बिजोत्पादकांची सहमती राहील.

१३) बिजोत्पादन कार्यक्रमातील उत्पादीत कच्चे बियाणे जर महाबीजच्या चाचणीत जसे उगवणशक्ती, इतर ओळखू येणारे बियाणे, बियाण्यातील आर्द्रता (१२ टक्के पेक्षा जास्त नसावी.) पावसाने ओले झालेले, रंगहीन, डागाळलेले इत्यादी निकषावरुन बियाणे योग्य नसल्याचे आढळल्यास असे कच्चे बियाणे महाबीज स्विकारणार नाही व प्रक्रीया केंद्रावर आलेले असल्यास, असे कच्चे बियाणे बिजोत्पादकास परत करण्यात येईल. तथापी बिजोत्पादकांचे विनंती वरुन अशा अस्विकृत कच्च्या बियाण्याची पुढील प्रक्रिया करावयाची असल्यास, प्रक्रिया खर्च संबंधित बिजोत्पादकाने करावयाचा आहे व अशी प्रक्रिया क्रमवारीनुसार करण्यात येईल.

१४) महाबीजचे बिज प्रक्रिया केंद्रावर स्विकारण्यात आलेल्या कच्चे बियाण्याची प्रक्रियां करुन प्राप्त झालेल्या चांगल्या बियाण्यास बियाणे अधिनियमानुसार बुरशीनाशक/किटकनाशकाची बिज प्रक्रिया करणे बंधनकारक आहे ही बाब तथा बिज प्रमाणिकरण यंत्रणेच्या चाचण्यामध्ये किमान माणकांनुसार बियाणे अपात्र ठरल्यास त्याची उचल केल्यानंतर अशा नापास बियाण्याचा खाद्य/तेलाकरीता/पशुखाद्याकरीता उपयोग करता येणार नाही ही बाब बिजोत्पादकास स्विकृत राहील. तसेच विपणनाच्या गरजेनुसार बियाण्यास कलर ट्रिटमेंट करण्यात येईल व यास बिजोत्पादकांची सहमती राहील.

(पान ४ .... वर)

१५) एकाच हंगामात उत्पादित केलेले सारख्या प्रतीचे व जातीचे प्रमाणित बियाण्याची चाळणी करतेवेळी, पूर्व चाचणीच्या निकषावरुन असे बियाणे एकत्र (बल्कींग) करण्याचा अधिकार महाबीजला राहील व त्यास संबंधीत बिजोत्पादकांची तक्रार असणार नाही व अशा प्रकारे एकत्रिकरणांमुळे वैयक्तिक बिजोत्पादकांच्या बियाण्या संदर्भातील गुणवत्ते विषयीच्या वा अनुवांशिक गुणात्मक प्रमाणिकरणातील बदलाबाबत महाबीज जबाबदार राहणार नाही.

१६) कच्चे बियाणे, प्रमाणित बियाणे यावर वातावरणातील बदलामुळे जसे की, हवामानातील आर्द्रतेमुळे वा हवामानातील बाष्पीभवनामुळे प्रभाव पडून वजन कमी/जास्त होते, ते काल मर्यादे अंतर्गत, स्थिर राहण्याच्या दृष्टीने वजन माप कायदा व शास्त्र यांचे आधारावर मान्य मर्यादेत त्याच अतिरिक्त भर टाकणे अनिवार्य ठरते व ही बाब बिजोत्पादकांना मान्य आहे. तथापी शोधनाबाबत निर्धारीत वजनाचा तोल सांभाळण्यासाठी जे अतिरिक्त बियाणे टाकण्यात येईल, त्यास बिजोत्पादकांची मान्यता राहील व अशा अतिरिक्त मात्रेची किंमत महाबीज द्वारा अदा करण्यात येईल.

१७) बियाणे प्रक्रिया केल्यानंतर चाळणी खालील निम्नस्तर बियाणे महाबीज बिजोत्पादकांना परत करेल, सदर निम्नस्तर बियाणे प्रक्रियेनंतर १५ दिवसाचे आत संबंधित बिजोत्पादकांना उचल करावे लागेल. बिजोत्पादकांनी हे बियाणे विहीत वेळेत उचल न केल्यास, त्यावर साठवणूक खर्च आकारण्यात येईल. त्यानंतर महाबीजद्वारे हे निम्न स्तर बियाणे लिलावाद्वारे विक्री करण्यात येईल व प्राप्त रक्कमेतून सेवा शुल्क व इतर थकीत रक्कम वजा जाता उर्वरित रक्कमेचे संबंधित बिजोत्पादकाला शोधन करण्यात येईल अथवा समायोजीत करण्यात येईल.

नापास बियाणे सुध्दा सुचना मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत कच्च्या बियाण्यांवर दिलेला अग्रीम इत्यादी जमा करुनच उचलावे लागेल अन्यथा त्यावर साठवणूक खर्च आकारणे व आहे त्या परिस्थितीमध्ये त्याची विल्हेवाट लावणे आणि व त्या रक्कमेतून अग्रीम इत्यादी रक्कम वसूल करणे व त्यानंतरही काही शिल्लक राहिलेली रक्कम असल्यास वसूल करणे बाबतचा अधिकार महाबीजला राहील. त्याकरिता बिजोत्पादकांना महाबीजकडे नुकसान भरपाई मागणीचा अधिकार राहणार नाही.

१८) हा करारनामा सन.................. च्या..................हंगामासाठी असून, या करारनाम्यात वेळोवेळी काही सुधारणा अथवा दुरुस्ती करणे भाग पडल्यास, सदर सुधारणा बिजोत्पादकावर बंधनकारक राहतील.

१९) उत्पादित होणाऱ्या बियाण्याच्या दर्जा कमी प्रतीचा असल्याचे जर महाबीजचे तांत्रिक अधिकाऱ्यांचे निदर्शनास आले तर असे संपूर्ण बियाणे नाकारण्याचा अधिकार महाबीज राखून ठेवीत आहे. तसेच अग्रीम रक्कम घेतांना वजन वाढविण्याच्या दृष्टीने गैर मार्गाचा अवलंब बिजोत्पादकांकडून झाल्याचे निदर्शनास आल्यास दंडात्मक वसुली अगर कायदेशीर कार्यवाही करण्याचा अधिकार महाबीजला राहील.

२०) पायाभूत/प्रमाणित व सत्यप्रत बियाणे महाबीजच्या गुणवत्ता नियंत्रण प्रयोग शाळेत व क्षेत्र चाचणीत तसेच बीज प्रमाणिकरण यंत्रणेच्या बीज परीक्षण प्रयोग शाळेत व क्षेत्र चाचणीत पास होणे आवश्यक आहे. महाबीजच्या अथवा प्रमाणिकरण यंत्रणेच्या चाचणीत नापास झालेले बियाणे स्विकारणे महाबीजला बंधनकारक राहणार नाही.

२१) या कराराद्वारे बिजोत्पादक हे मान्य करतात की, बिजोत्पादन कार्यक्रमाच्या प्रक्रियेत सहभाग हा ''व्यापारीय उत्पन्न'' पध्दत ठरते, की ज्यामध्ये बिजोत्पादक हा महामंडळाचा ग्राहक नसून महामंडळाकडून पुरवठा करण्यात आलेल्या स्त्रोत बियाण्यापासून बिजोत्पादकाचे क्षेत्रावर उत्पादित झालेले असे पात्र बियाणे महाबीजला ठरवून दिलेल्या भावाप्रमाणे पुनश्च विक्री करावयाचे आहे. त्यामुळे हा व्यवहार करारनाम्या अंतर्गत होत असल्याने, बिजोत्पादक हा ''उपभोक्ता अथवा ग्राहक'' या सदराखाली मोडत नाही ही बाब बिजोत्पादकास मान्य आहे.

२२) कापूस सारखे बियाणे, ज्याची पूर्व प्रक्रिया महाराष्ट्र राज्य कापूस पणन महासंघ किंवा सूत गिरणी किंवा सीसीआय किंवा खाजगी व्यापारी मार्फत केली जाते, त्याबाबत जोपर्यंत सरकी बियाणे महाबीजच्या ताब्यात येत नाही, तोपर्यंत त्याबाबतीत कोणतीही जबाबदारी महाबीजची राहणार नाही.

२३) जे बिजोत्पादक महाबीजला बिजोत्पादन कार्यक्रमातून उत्पादित कच्चे बियाणे संपूर्णपणे ताब्यात न देता कमी मात्रेत देतील, त्यांना जाहीर केलेल्या खरेदी धोरणापेक्षा कमी खरेदी दर देण्याचा अधिकार महाबीजला राहील.

२४) जे बिजोत्पादक महाबीजला बिजोत्पादन कार्यक्रमातून उत्पादित कच्चे बियाणे ताब्यात देणार नाहीत, अशा बिजोत्पादकांना पुढील बिजोत्पादन कार्यक्रम देणे वा न देण्याबाबतचा तथा उचित कायदेशीर कार्यवाही करण्याचा अधिकार महाबीजला राहील.

(पान ५ .... वर)

तसेचे बिजोत्पादन कार्यक्रम क्षेत्रातील उत्पादीत कच्चे बियाणे ऐवजी इतर साठा/बाजारातील साठा बियाणे म्हणून देण्याची बाब निदर्शनास आल्यास अशा बिजोत्पादकांवर फसवणुकी बाबत दंडात्मक/कायदेशीर कार्यवाही करण्याचा अधिकार महाबीजला राहील.

२५) आरक्षण योजने अंतर्गत बियाणे उत्पादनासाठी नाव नोंदणी केली तरी जो पर्यंत संबंधित बिजोत्पादकांचे बियाणे उपलब्ध करुन घेवून ते त्यांच्या शेतामध्ये संबंधित अधिकाऱ्यांच्या सुचनेनुसार पेरल्या जात नाही व त्याबद्दल त्या कार्यक्रमाची बीज प्रमाणिकरण यंत्रणेकडे नोंदणी होत नाही, तोपर्यंत बिजोत्पादन कार्यक्रमाबद्दल महाबीज जबाबदार राहणार नाही.

२६) बिजोत्पादन कार्यक्रमातील पिकाचे उत्पन्न हे मुख्यत: पेरणीची वेळ, पेरणी पध्दत, जमिनीतील आर्द्रता/पाऊसमान/खते देणे व कीटकनाशक फवारणी मात्रा व वेळ, वेळेवर आंतर मशागत करणे, वेळेवर पीक काढणी/मळणी करणे तसेच इतर अनुषंगीक कारणांवर व निसर्गावर अवलंबून असल्यामुळे, बिजोत्पादन कार्यक्रमाअंतर्गत हमखास उत्पन्नाची अगर नफ्याची कुठल्याही प्रकारची हमी महाबीजकडून राहणार नाही.

२७) बिजोत्पादना अंतर्गत उत्पादित बियाणे बीज परीक्षणामध्ये जरी पात्र ठरत असेल, परंतु अवेळी आलेल्या पावसामुळे अथवा कोणत्याही कारणाने बियाण्याच्या मुळ चकाकीवर व रंगावर जर अनिष्ठ परिणाम आढळून आला तर अशा प्रकारचे बियाणे महामंडळास घेणे बंधनकारक राहणार नाही.

२८) बियाण्याची उगवणशक्ती, शुध्दता, विवक्षीत प्रमाणिकरणासाठी अतिरीक्त बियाणे, बियाण्याच्या उगवस्थान आदी बाबत तथा तांत्रिक बाबींबाबत कृषि आयुक्तालया अंतर्गत जी न्याय व्यवस्था आहे, तिचे पालनास बिजोत्पादकांची संमती राहील. तसेच तक्रार निवारण साधावयाचे झाल्यास, शासनाद्वारे नियमितत जी तक्रार निवारण यंत्रणा आहे, त्या माध्यमातूनच बिजोत्पादकास जावे लागेल.

२९) बिजोत्पादकांनी उत्पादीत केलेले पायाभूत/प्रमाणीत/सत्यप्रतीदर्शक बियाणे पुढील हंगामात वितरीत केल्यानंतर शेतकऱ्यांचे शेतात त्यामध्ये भेसळीबाबत तक्रार प्राप्त झाल्यास आवश्यक ती चौकशी/चाचणीअंती यामध्ये बिजोत्पादकाचा दोष असल्याचे सिध्द झाल्यास याबाबतची जबाबदारी बिजोत्पादकाची राहील व त्याबाबत दंडात्मक वसुली अगर कायदेशीर कार्यवाही करण्याचा अधिकार महाबीजला राहील.

३०) हंगामामध्ये पाऊस किंवा इतर नैसर्गिक आपत्तीमुळे बियाणे उपलब्धता कमी झाली अशा वेळेस शासनाने बियाणे उपलब्धता जास्तीत जास्त होण्याचे दृष्टीने प्रोराटा बियाणे पुरवठा करण्याचे ठरविले व त्यानुसार आदेश दिल्यास उगवशक्तीची टक्केवारी मानकाप्रमाणे नापास बियाणे संबंधीत बिजोत्पादकांना परत घेऊन जाता येणार नाही. संबंधीत बिजोत्पादकांना शासनाचे आदेश बंधनकारक राहतील.

३१) वरील अटीपैकी कोणत्याही अटीचा भंग केल्यास बिजोत्पादकाला भविष्यात कोणताही बिजोत्पादन कार्यक्रम न देण्याचा तथा कायदेशीर कार्यवाही करण्याचा अधिकार महाबीजला राहील.

३२) बिजोत्पादक तथा महाबीज यामध्ये कराराचा अर्थ, त्याचे परिशिलन तथा त्यांची अंमलबजावणी याबाबत काही वाद उदभवल्यास, व्यवस्थापकीय संचालक महाबीज, अकोला हे न्याय निवाडा करण्याबाबत आरबीट्रेशन ॲक्ट १९६६ अंतर्गत सक्षम अधिकारी तथा लवाद असतील. या करार पत्रातील अटींचे विवेचन करणे, अर्थ लावणे व त्यानुसार कारवाई तथा आदेश देण्यास ते प्राधिकृत ठरतील व सदर लवादाचा निर्णय अंतीम निर्णय म्हणून उभय पक्षांवर बंधनकारक राहील.

३३) सदर बिजोत्पादनाचा कार्यक्रम कोठेही आवंटीत करण्यात आला असला तरी वरील कलम ३२ नुसार कार्यवाही होऊनही जर काही वाद शिल्लक राहिल्यास अशा बाबतीत सदर दावे हे फक्त अकोला दिवाणी न्यायालयाचे कार्यकक्षेतच चालतील.

(पान ६ .... वर)

वरील सर्व अटी व शर्ती उभयपक्षांना मान्य व कबूल असल्याने त्याच्या सत्यतेसाठी सदर कराराच्या दस्तावर उभयतांनी आपआपल्या सह्या / अंगठे साक्षीदारांसमक्ष केल्या आहेत.

ठिकाण/स्थळ ........................

महा. राज्य बियाणे महामंडळ मर्या., अकोला करिता
सक्षम अधिकारी सही

दिनांक ....................

..........................................

साक्षीदार

१) सही/अंगठा ..........................

नाव ..........................

..........................

पत्ता ..........................

..........................

..........................

२) सही/अंगठा ..........................

नाव ..........................

..........................

पत्ता ..........................

..........................

..........................

३) सही/अंगठा ..........................

नाव ..........................

..........................

पत्ता ..........................

..........................

..........................

| | महाबीज बिजोत्पादक नाव | सही / अंगठा |
|---|---|---|
| १) | .......................... | .................... |
| २) | .......................... | .................... |
| ३) | .......................... | .................... |
| ४) | .......................... | .................... |
| ५) | .......................... | .................... |
| ६) | .......................... | .................... |
| ७) | .......................... | .................... |
| ८) | .......................... | .................... |
| ९) | .......................... | .................... |
| १०) | .......................... | .................... |
| ११) | .......................... | .................... |
| १२) | .......................... | .................... |
| १३) | .......................... | .................... |
| १४) | .......................... | .................... |
| १५) | .......................... | .................... |
| १६) | .......................... | .................... |
| १७) | .......................... | .................... |
| १८) | .......................... | .................... |
| १९) | .......................... | .................... |
| २०) | .......................... | .................... |

(पान ७ .... वर)

परिशिष्ट-१ : बिजोत्पादक शेतकरीनिहाय बिजोत्पादन व संकलीत करावयाचा बियाणे मात्रा तपशील

गाव : ........................ तालुका ........................... जिल्हा ............................

| अ. क्र. | बिजोत्पादक शेतकऱ्याचे नाव | पिक / वाण | दर्जा | क्षेत्र. (हे.) | संकलन करावयाची कच्चे बियाणे मात्रा (क्विंटल) | सही |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | |
| 2 | | | | | | |
| 3 | | | | | | |
| 4 | | | | | | |
| 5 | | | | | | |
| 6 | | | | | | |
| 7 | | | | | | |
| 8 | | | | | | |
| 9 | | | | | | |
| 10 | | | | | | |
| 11 | | | | | | |
| 12 | | | | | | |
| 13 | | | | | | |
| 14 | | | | | | |
| 15 | | | | | | |
| 16 | | | | | | |
| 17 | | | | | | |
| 18 | | | | | | |
| 19 | | | | | | |
| 20 | | | | | | |

| साक्षीदार | साक्षीदार | साक्षीदार |
|---|---|---|
| सही/अंगठा | सही/अंगठा | सही/अंगठा |
| ........................ | ........................ | ........................ |
| ........................ | ........................ | ........................ |